पाहिजेत
ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास पाहिजेत
नामांकित कंपनी साठी सबस्टेशन कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/ वायरमन, 12 वी पास फ्रेश/ अनुभवी मुले त्वरित पाहिजे.
संपर्क - 9923155996

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त
पाटील इलेक्ट्रॉनिक्स इन्स्टिट्यूट सातारा
Email : patilinstitutesatara@gmail.com
महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश
सर्टीफिकेट कोर्सेसना प्रवेश : पात्रता - 10 वी, 12 वी पास/ नापास व कॉलेजचे विद्यार्थी
* इलेक्ट्रिकल सुपरवायझर * ऑटोमोबाईल टेक्निशियन
* इलेक्ट्रिकल वायरमन * मोटार वायडिंग
* टू-व्हीलर मेकॅनिक * फोर व्हीलर मेकॅनिक
* A.C. मेकॅनिक * वेल्डर / फ्लंबर
* कॉम्प्युटर ऑपरेटर * कॉम्प्युटर हार्डवेअर
एस. टी. पास, लायसेन्स व प्लेसमेंटची सोय
प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.
प्रवेशासाठी संपर्क : 9822097071 / 7709509500

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक २१ वा | बुधवार, दि. ०५ ऑगस्ट २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# दिव्यांगांच्या हक्कावर दरोडा! बनावट प्रमाणपत्र रॅकेटचा पर्दाफाश

## सोलापूर शासकीय रुग्णालयातील 2 लिपिकांसह 6 जण अटकेत



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात बनावट दिव्यांग प्रमाणपत्रे तयार करून शासनाची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. ४५ टक्के अपंगत्वाचे बनावट प्रमाणपत्र तयार करून त्याचा गैरवापर केल्याप्रकरणी शहर गुन्हे शाखा पोलिसांनी मोठी कारवाई करत शासकीय रुग्णालयातील दोन लिपिकांसह एकूण सहा जणांना अटक केली आहे.

या प्रकरणामुळे सरकारी यंत्रणांमधील दस्तऐवज पडताळणी प्रक्रियेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या प्रकरणी सोलापूर शासकीय रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. ऋत्विक जयकर यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून त्यानंतर शहर गुन्हे शाखेने तपासाची सूत्रे हाती घेत मोठी कारवाई केली.

**बनावट कागदपत्रांच्या आधारे दिव्यांग प्रमाणपत्र**

प्राथमिक तपासात आरोपींनी बनावट पत्त्याचे पुरावे आणि खोटे आधारकार्ड तयार करून ४५ टक्के अपंगत्वाचे दिव्यांग प्रमाणपत्र मिळवल्याचे समोर आले आहे. या प्रमाणपत्रांचा वापर शासकीय नोकरी, आरक्षण तसेच इतर शासकीय योजनांचा लाभ मिळवण्यासाठी करण्यात आल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

**तक्रारीनंतर सुरू झाला तपास**

दिव्यांग संघटनेने संशय व्यक्त करत तक्रार केल्यानंतर अधिष्ठाता डॉ. ऋत्विक जयकर यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली. त्यांनी संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यासाठी तीन सदस्यीय समिती नियुक्त केली. समितीच्या अहवालात अनियमितता आढळल्यानंतर पोलिसांकडे अधिकृत फिर्याद देण्यात आली.

**गुन्हे शाखेची मोठी कारवाई**

फिर्याद दाखल झाल्यानंतर सोलापूर शहर गुन्हे शाखेने तपास सुरू केला. तपासादरम्यान बनावट कागदपत्रांच्या आधारे दिव्यांग प्रमाणपत्रे तयार केल्याचे प्राथमिक पुरावे समोर आल्यानंतर पोलिसांनी आरोपींना अटक केली. या प्रकरणात आणखी काही जणांचा सहभाग आहे का, याचाही तपास सुरू आहे.

**आणखी धागेदोरे तपासणार**

सोलापूर पोलिसांकडून जप्त करण्यात आलेली कागदपत्रे, संगणकीय नोंदी आणि प्रमाणपत्रांची पडताळणी सुरू असून, या रॅकेटमधून आणखी किती जणांनी लाभ घेतला आहे, याचा शोध घेतला जात आहे. तसेच इतर शासकीय कार्यालयांशी या प्रकरणाचे काही संबंध आहेत का, याचाही तपास सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

**आठ जणांना अटक**

या प्रकरणात पोलिसांनी खालील आरोपींना अटक केली आहे.

1. विजय बाळासाहेब गर्जे- शिक्षक, अहमदनगर
2. राजेश भाऊसाहेब जाधव, कनिष्ठ लिपिक, पाटबंधारे विभाग
3. महेश दिनकर बारगजे
4. रमेश रमाकांत ढवण
5. सागर राजपूत -वरिष्ठ लिपिक, शासकीय रुग्णालय, सोलापूर
6. वसीम खान-कनिष्ठ लिपिक, शासकीय रुग्णालय, सोलापूर

यातील शासकीय रुग्णालयातील दोन्ही लिपिकांविरोधात सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यांनाही अटक करण्यात आली आहे.

## कर्मचाऱ्यांच्या प्रामाणिक कामामुळे मोहोळ नागरीची भरभराट- राजन पाटील

### मोहोळ नागरी पतसंस्थेच्या ठेवी २१० कोटींच्या पार



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):** मोहोळ नागरी पतपुरवठा पतसंस्थेत कर्मचाऱ्यानी प्रामाणिक पणे संस्थेचे व सभासदाचे हित लक्षात घेऊन काम केल्याने संस्थेची प्रगती झाली आहे. आज ठेवी २०० कोटींच्या पुढे गेल्या आहेत. तर निव्वळ नफा ५ कोटी ०७ लाख इतका झाला आहे. मोहोळ नागरी पतपुरवठा संस्थेने व्यावसायिक म्हणून काम न करता सभासदांचे हीत जोपासण्याचे काम केले आहे. असे सांगत अनेक पतसंस्था व अन्य संस्था बंद पाडण्यात कर्मचाऱ्यांचा सहभाग असतो, परंतु त्याचा ठपका चेअरमन व संचालक मंडळावर येतो. परंतु मोहोळ नागरी च्या कर्मचाऱ्यांनी अत्यंत चांगले काम केले आहे. यामुळे येणाऱ्या काळात मोहोळ नागरी पतपुरवठा संस्था आपला विस्तार नक्कीच वाढवेल असा आशावाद सहकार राज्य परिषदेचे अध्यक्ष ना. राजन पाटील यांनी केले.

मोहोळ नागरी सहकारी पतपुरवठा संस्थेची ४२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न झाली. याप्रसंगी ते बोलत होते. या वेळी अध्यक्षस्थानावरून संस्थेचे चेअरमन डॉ. कौशिक गायकवाड म्हणाले की, या पतसंस्थेत इतर बँका पेक्षा कमी व्याजदराने कर्ज पुरवठा केला जातो. त्यामुळे सभासदांना कर्ज फेडणे सोयीचे होते. मोहोळ नागरी पतपुरवठा संस्थेचे संचालक मंडळ व कर्मचारी हे सभासदांच्या सेवेसाठी कायम तत्पर असतात त्यामुळे सभासदांनी व इतर नागरिकांनी मोहोळ नागरी मोहोळ नागरी सहकारी पत पुरवठा संस्था मर्यादित, मोहोळ स्त्री वार्षिक सर्वसारण समा मध्ये विश्र्वासाने ठेवी ठेवाव्या त्याचे प्रामाणिकपणे जतन आम्ही करू असे डॉ. कौशिक गायकवाड म्हणाले. या प्रसंगी शंभर टक्के कर्ज वसुली केलेल्या शाखा प्रमुखांचा सन्मान महाराष्ट्र राज्य सरकार परिषदेचे अध्यक्ष राजन पाटील यांच्या

उपस्थितीत चेअरमन डॉ. कौशिक गायकवाड, व्हॉईस चेअरमन प्रमोद डोके संचालक सतीश भोसले, शहाजी गुंड, चंद्रकांत वाघमोडे आदी संचालकांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या प्रसंगी अहवाल वाचन संस्थेचे व्यवस्थापक मुस्ताक शेख यांनी केले. तर आभार पतसंस्थेची व्हाईस चेअरमन प्रमोद डोके यांनी व्यक्त केले. यावेळी संचालक जगन्नाथ कोल्हाळ, नारायण गुंड, सतीश भोसले, शहाजी गुंड, दिलीप पाटील, बाजीराव जोशी, चंद्रकांत वाघमोडे, रमेश देशमाने, तानाजी रोहीटे, किर्ती देशपांडे, रंभादेवी गुंड यांच्यासह ज्येष्ठ सभासद खाजाभाई शेख, मोहन होनमाने, राकेश देशमाने, सलीम हरणमारे, राजाराम वाघमारे, नागेश भोसले, आदींसह सभासद शाखा प्रमुख त्यांचे सहकारी उपस्थित होते.

**नफा ५ कोटी ०७ लाख, १५ टक्के प्रमाणे सभासदांना लाभांश जाहीर**

संस्थेच्या ठेवी २१०. ७३ कोटी असुन कर्जवाटप १३१.३१ कोटी आहे. चालु वर्षी संस्थेस ५ कोटी ०७ लाख इतका नफा झालेला आहे. खेळते भांडवल २९३.५७ कोटी असुन संस्थेचे गंगाजळी व इतर निधी ६२.८० कोटी आहेत.संस्थेने चालु वर्षी १५ टक्के प्रमाणे सभासदांना लाभांश वाटप जाहिर केले आहे. एनपीओ 00.00 टक्के आहे. कजार्ची वसुली ९९.९० टक्के आहे. संस्थेस ऑडीट वर्ग अ मिळाला आहे.

## सोलापूर ZPतील सभागृहाचे 'शिवरत्न' नाव हटविले

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीची बैठक आज अध्यक्ष दीपक वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्या बैठकीत सोलापूर जिल्हा परिषदेच्या सभागृहाचे 'शिवरत्न' हे नाव बदलून 'भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह' असे नामकरण करण्यात आले आहे, त्याची जिल्ह्याच्या राजकीय वतुर्ळात दबक्या आवाजात चर्चा सुरू झाली आहे. त्यातून राजकीय वातावरण तापण्याची चिन्हे आहेत.

स्थायी समितीच्या बैठकीत जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष इंद्रजित पवार यांनी सभागृहाचे 'शिवरत्न' हे नाव बदलून 'भारतरत्न अटबिहारी वाजपेयी सभागृह' करण्याचा ठराव मांडला. उपाध्यक्ष पवार यांनी मांडलेला ठराव एकमताने मंजूर करण्यात आला, त्यामुळे जिल्हा परिषदेला अनेक वर्षे जोडलेले शिवरत्न नाव आता झेडपीतून पुसले जाणार आहे.

सोलापूर जिल्हा परिषदेतील सभागृहाचे शिवरत्न नाव बदलण्याचे पडसाद राजकीय वर्तुळात उमटण्याची शक्यता नाकारता येत नाही, त्यामुळे विरोधकांच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष असणार आहे. या ठरावासोबतच इतरही अनेक महत्वपूर्ण या सभेत मंजूर करण्यात आले आहेत.

जिल्ह्यातील ११ तालुक्यांत ११ आदर्श शाळा उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यातून प्रत्येक तालुक्यात दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न असणार आहे.विकास कामांना गती देण्यासोबतच त्याची गुणवत्ता, पारदर्शकता आणि नागरिकांना प्रभावी सेवा मिळावी, अशी अपेक्षा या बैठकीत व्यक्त करण्यात आली.

**राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण**



**डी. वाय. पाटलांना श्रद्धांजली अर्पण**

दरम्यान, बैठकीच्या सुरुवातीलाच माजी राज्यपाल पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनाबद्दल दोन मिनिटे मौन पाळून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर स्थायी समितीच्या २५ जूनला झालेल्या बैठकीचे कार्यवृत्त वाचून कायम करण्यात आले.

या वेळी शिक्षण व आरोग्य समिती सभापती चेतनसिंह केदार, कृषी, पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती सभापती रामप्पा चिवडशेट्टी, महिला व बालकल्याण समिती सभापती अमृता वाघे, समाजकल्याण समिती सभापती संस्कृती सातपुते, समिती सदस्य पृथ्वीराज माने, आदिनाथ देशमुख, रश्मी बागल, बालाजी नरुटे आणि रमेश श्रीमंत भांजे, तसेच सर्व अधिकारी उपस्थित होते.

## मनोज जरांगे शुक्रवारपासून पश्चिम महाराष्ट्र दौऱ्यावर

### शनिवारी व रविवारी सोलापूर जिल्ह्यात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारविरोधात पुन्हा एकदा निर्णायक आंदोलनाची घोषणा केली आहे. मराठा समाजाच्या प्रलंबित मागण्या २८ ऑगस्टपर्यंत पूर्ण न झाल्यास २९ ऑगस्टपासून बेमुदत उपोषण सुरू करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला आहे. आगामी आंदोलनापूर्वी



मराठा समाजाशी थेट संवाद साधण्यासाठी जरांगे पाटील हे शुक्रवार, ७ से बुधवार, १२ ऑगस्ट या कालावधीत पश्चिम महाराष्ट्र दौरा करणार आहेत.

या दौऱ्यात ते मराठा समाजबांधवांशी प्रत्यक्ष गाठीभेटी घेऊन आगामी आंदोलनाची भूमिका स्पष्ट करणार आहेत. जरांगे पाटील यांनी सरकारला अंतिम मुदत देत शिंदे समितीने शोधलेल्या ५८ लाख मराठा-कुणबी नोंदींच्या आधारे तातडीने कुणबी प्रमाणपत्रे वाटप करावेत, अशी प्रमुख मागणी केली आहे. (पान 2 वर..)

## सोलापूर महापालिका; नालेसफाई कामात भ्रष्टाचार

### महापौरांविरोधात भाजपच्याच देशमुख गटाचे नगरसेवक मैदानात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नालेसफाईत झालेल्या भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावरून महापालिकेत सत्ताधारी भाजपच्या नगरसेवकांनी महापौर विनायक कोंड्याल यांना लक्ष्य केले. याप्रकरणी भाजपाचे आमदार देशमुख गटाच्या ३० नगरसेवकांनी आयुक्तांना निवेदन देत बंडाची तयारी केली आहे.

सोलापूर महापालिकेत अधिकाऱ्यांना हाताशी धरून सत्ताधारी भाजपातील काही पदाधिकाऱ्यांनी नालेसफाईत कोट्यवधींचा भ्रष्टाचार केल्याचा आरोप होत आहे. पालिकेच्या सर्वसाधारण सभेत भाजपाचे आमदार देवेंद्र कोठे गटाचे महापौर विनायक कोंड्याल यांना लक्ष्य करत देशमुख गटाच्या नगरसेवकांनी लक्ष्यवेधी ठरावाद्वारे नालेसफाईतील भ्रष्टाचार उघडकीस आणला आहे. सभेत सत्ताधाऱ्यांमध्येच खडाजंगी होऊन प्रचंड वाद झाल्याने पालिका आयुक्त सचिन ओम्बासे यांनी चौकशीचे आदेश दिले.

दरम्यान, या भ्रष्टाचारप्रकरणी प्रभारी नगर अभियंता सारिका आकुलवार यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आल्याने त्यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्यात आले. या चौकशीदरम्यानच भाजपातील काही पदाधिकाऱ्यांनी आकुलवार यांच्याकडे पुन्हा नगर अभियंत्याचा पदभार देण्याचा घाट घातल्याने संतप्त झालेल्या आमदार विजय देशमुख गटाच्या ३०हून अधिक



नगरसेवकांनी आयुक्त ओम्बासे यांना निवेदन देत आकुलवार यांच्याकडे पदभार देण्यास विरोध केला. तसेच चौकशी निःपक्षपातीपणे न झाल्यास टाळे ठोकण्याचा इशाराही दिला.

महापालिकेत भाजपाचे आमदार कोठे व आमदार देशमुख गटाचे नगरसेवक हे अनेक मुद्द्यांवरून आमने-सामने येत असल्याने भाजपातील खदखद वारंवार बाहेर पडत आहे. महापौर कोंड्याल यांना नालेसफाईतील भ्रष्टाचारावरून लक्ष्य करण्यात येत असून, आमदार देशमुखसमर्थक नगरसेवक आता उघडपणे मैदानात उतरले आहेत. नालेसफाई कामात कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप देशमुख समर्थक नगरसेवक अनंत जाधव यांनी केला असून, आयुक्तांकडे पुराव्यानिशी तक्रार दिली आहे. यावेळी भाजपाचे नगरसेवक शिवानंद पाटील, राजकुमार पाटील, संजय कोळी, काशिद गायकवाड, वडताल यांच्यासह ३०हून नगरसेवक उपस्थित होते.

## पूराचा विळखा कायम; पंढरपूरसह दक्षिण सोलापूर-अक्कलकोटमध्ये जनजीवन विस्कळीत

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पुणे जिल्ह्यातील पावसामुळे सोलापूरची वरदायिनी असलेले उजनी धरण १०० टक्के भरले आहे. पूर नियंत्रणासाठी उजनीतून भीमा नदीपात्रात करण्यात आलेल्या मोठ्या विसगार्मुळे सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर, दक्षिण सोलापूर आणि अक्कलकोट तालुक्यात पूरस्थिती निर्माण झाली आहे.

चंद्रभागा नदीने इशारा पातळी ओलांडल्यामुळे नदीकाठच्या १०० हून अधिक घरांमध्ये पाणी शिरले असून शेकडो एकरांवरील पिके पाण्याखाली गेली आहेत. दरम्यान, रविवारी (ता. २) सायंकाळपासून उजनीचा विसर्ग घटवून ६० हजार क्यूसेक करण्यात आल्याने पाणी ओसरण्याची शक्यता प्रशासनाने वर्तवली आहे.

उजनी व वीर धरणांतील विसगार्मुळे पंढरपुरात चंद्रभागा नदी इशारा पातळीवरून वाहू लागली आहे. नदीकाठच्या अंबाबाई पटांगण व व्यास नारायण झोपडपट्टी परिसरातील जवळपास ११० कुटुंबांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले आहे. तसेच चंद्रभागा वाळवंटातील सर्व मंदिरे, विष्णू प्रभूपाद घाट आणि तालुक्यातील आठही बंधारे पाण्याखाली गेले आहेत.



पूरग्रस्तांसाठी विठ्ठल मंदिर समितीतर्फे भोजनाची व्यवस्था करण्यात आली असली, तरी रविवारी दुपारी उशिरापर्यंत जेवण न मिळाल्याने महिला व लहान मुलांचे हाल झाल्याची तक्रार माजी नगरसेवक विक्रम शिरसाट यांनी केली. आमदार समाधान आवताडे, प्रांताधिकारी सचिन इथापे व तहसीलदार सचिन लंगोटे यांनी पूरस्थितीची पाहणी करून अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.

दुसरीकडे हेच पाणी पुढे अक्कलकोटपर्यंत जात असल्यने दक्षिण सोलापूर आणि अक्कलकोटलाही त्याचा फटका बसला. दक्षिण सोलापूर तालुक्यात भीमेला आलेल्या महापुरामुळे कुसुर, वडापूर, सादेपूर, बाळगी, भंडारकवठे, औज, कुरगोट, बरूर, टाकळी, हत्तरसंग आणि कुडल या ११ गावांच्या शेतीमध्ये पुराचे पाणी घुसले आहे. हत्तरसंग आणि कुडल येथे सीना व भीमा नद्यांना एकाच वेळी पूर आल्याने संगमस्थळी पाण्याचा प्रचंड फुगवटा तयार झाला आहे. तसेच प्रमुख बंधारे पाण्याखाली गेल्याने महाराष्ट्र आणि कर्नाटकला जोडणाऱ्या अनेक मार्गावरील वाहतूक बंद करण्यात आली आहे.

मंद्रूपचे अपर तहसीलदार विष्णू बुटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस व आपत्ती व्यवस्थापन पथके तैनात करण्यात आली आहेत. अक्कलकोट तालुक्यात आळगे, हिंगणे, खानापूर आणि हिळ्ळी हे तीनही बंधारे पूर्णपणे पाण्याखाली (पान 2 वर..)

पाहिजे

पाहिजेत

वृत्तदर्पण न्यूज चॅनल व दैनिक कटूसत्य यांच्या संयुक्त विद्यमाने एक अभिनव व अनोखी योजणा राबविण्याचा संकल्प आहे. त्यासाठी सोलापूर शहरातील प्रत्येक प्रभागात व जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात कायम पगारावर खालील पदे भरावयाची आहेत. या करीता सोलापूर शहरातील प्रत्येक प्रभाग, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट, बार्शी, मोहोळ, माढा, करमाळा, पंढरपूर, माळशिरस, सांगोला, मंगळवेढा या तालुका परीसरात एक प्रतिनिधी नेमणे आहेत. ही योजना यशस्वी करण्यासाठी खालील पदे भरावयाची आहेत.

| अ.क्र. | पदाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | लिंग | पगार/मानधन व कमिशन (मासिक) | अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | सहाय्यक व्यवस्थापक | ४ | एम. बी.ए./ पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे | असल्यास प्राधान्य |
| २) | सह/उप संपादक | ५ | वृत्तपत्र पदविका / पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे | असल्यास प्राधान्य |
| ३) | पत्रकार / वार्ताहर | २५ | १२ वी ते पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ४) | कॅमेरामन | २५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ५) | मार्केटींग प्रतिनिधी | ६५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ६) | जाहिरात प्रतिनिधी | ६५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ७) | वसूली प्रतिनिधी | ५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे व कमिशन | असल्यास प्राधान्य |

नियम व अटी :- १) इच्छूक उमेदवारांनी आपल्या स्वहस्ताक्षरात संपूर्ण माहिती असलेला अर्ज भरुन, त्या सोबत शाळेचा दाखला, मार्कलिस्ट, भारतीय असल्याचा पुरावा, दोन फोटो जोडून, खालील पत्त्यावर १५ दिवसाच्या आत आणून द्यावे. २) वयोमर्यादा १८ वर्ष पूर्ण ते ५० वर्षापर्यंत, एक उमेदवार दोन पदासाठी अर्ज करु शकतो. ३) सर्व अधिकार सदर संस्थेकडे राखीव राहतील व ते अर्जदारांवर बंधनकारक राहतील. सदर संस्थेचा निर्णय अंतिम राहील. ४) सदरच्या नियुक्त्या केवळ मुलाखती घेवूनच केल्या जातील. आमच्या व आपल्या वेळेनुसार मुलाखत घेतली जाईल. उमेदवारांनी याची नोंद घ्यावी. ५) अर्ज स्वीकारण्याची वेळ रविवार सोडून सकाळी १० ते सायं. ६ वाजेपर्यंत. ६) मुलाखतीनंतर निवड झालेल्या सर्व उमेदवारांना मोफत प्रशिक्षण दिले जाईल. ७) स्वतःचे वहान असणाऱ्यास प्राधान्य.

संपर्क :- वृत्तदर्पण न्यूज चॅनल व दैनिक कटूसत्य कार्यालय, एफ-३, वृंदावन पार्क, महिंद्रा शोरुमसमोर, होटगी रोड, सोलापूर-१४३००३.

मो.९६५७०६९०६९, ९४०३४६३०७९

## संपादकीय

# माफीचे राजकारण

राजधानी नवी दिल्ली येथे जंतर-मंतरवर झालेल्या युवकांच्या आंदोलनावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबाबत आक्षेपार्ह शब्द वापरर्णाया तरुणांना मी माफ करत आहे, अशा प्रकारचा इन्स्टाग्राम व्हिडिओ नरेंद्र मोदी यांनी जारी केल्यानंतर देशात 'माफी' या विषयावर आता राजकारण सुरू झाले आहे.

नरेंद्र मोदी यांनी न मागताच त्या तरुणीला आणि इतरांना माफ केले आहे. पण या तरुणांवर पोलिसांमार्फत अत्याचार करण्याची जी घटना झाली त्याबद्दल नरेंद्र मोदी आणि त्यांचे सरकार कधी माफी मागणार आहे, असा सवाल आता विरोधी पक्षांकडून उपस्थित केला जात आहे. हा सवाल निश्चितच महत्त्वाचा आहे.

कारण माफी हा विषय नेहमीच दोन्हीही बाजूंनी असतो. माफी देणे आणि माफी मागणे या दोन्ही गोष्टी एखाद्या विषयाला पूर्णविराम देण्यासाठी महत्त्वाच्या असतात. नरेंद्र मोदी यांना शिवीगाळ करर्णाया त्या तरुणीवर एफआयआर दाखल झाल्यानंतर त्या तरुणीने झाल्या प्रकाराबद्दल माफी मागितली आहे. तशा प्रकारचा व्हिडिओसुद्धा आता जारी झाला आहे.

आंदोलनस्थळी काही लोकांनी मला प्रोत्साहित केल्यामुळे मी ही शिवीगाळ केली असे तिने तिच्या व्हिडिओमध्ये म्हटले आहे. साहजिकच आंदोलन करर्णाया या तरुणीने आपली चूक मान्य करून जर माफी मागितली असेल तर आता सरकारनेसुद्धा आपली चूक मान्य करून समस्त तरुणाईची माफी मागायला हरकत नाही, असा संदेश या निमित्ताने निश्चितच मिळत आहे.

जंतरमंतरवर आंदोलन सुरू असताना नरेंद्र मोदी यांनी कधीही त्याबद्दल प्रतिक्रिया व्यक्त केली नव्हती किंवा मतप्रदर्शनही केले नव्हते. पण आंदोलन संपल्यानंतर त्यांनी तरुणांच्या आवडत्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचा वापर करून विविध प्रकारे व्हिडिओ जारी करण्यास सुरुवात केली आहे. तरुणांपर्यंत पोहोचण्यासाठी हाच प्लॅटफॉर्म योग्य असल्याचे त्यांच्या लक्षात आले असले, तरी एकूण आंदोलनाच्या निमित्ताने जी एक सामाजिक घुसळण झाली त्याचा अर्थ लक्षात घेऊन मोदी सरकारने माफी मागून हा विषय संपवायला काहीच हरकत नाही.

माफी मागणारा नेहमी मोठा होतो हा नियम भारतीय संस्कृतीने सर्ाया जगाला दाखवून दिला आहे. जंतर-मंतरवर लोकशाही मार्गाने आंदोलन सुरू असताना जर काही बळाचा वापर झाला असेल किंवा अनुचित प्रकार घडले असतील, तर नरेंद्र मोदी आणि त्यांचे जवळचे सहकारी गृहमंत्री अमित शहा यांनी माफी मागायला काहीच हरकत नाही.

या आंदोलनाच्या निमित्ताने शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा ही आमच्यासाठी माफी मागण्यासारखीच गोष्ट आहे, असे जर सरकारला वाटत असेल तर ते चुकीचे आहे. स्पष्ट शब्दात माफी मागून दिलगिरी व्यक्त झाली तर विरोधकांच्या हातातील मुद्दाच निसटून जाईल. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे जंतर-मंतरवरील आंदोलन संपले असले तरी दोन्ही बाजूने याबाबतचे काही विषय जाणीवपूर्वक उपस्थित केले जात आहेत आणि क्रियेला प्रतिक्रिया म्हणून अनेक वादविवादही निर्माण होत आहेत.

महाराष्ट्राचे शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दगडफेकीतील दगडांवरील फिंगरप्रिंट्स घेऊन कारवाई करण्याबाबत जे विधान केले आहे तेसुद्धा असेच माफी मागण्याच्या पात्रतेचे आहे. जंतर-मंतरवरील तरुणांच्या आंदोलनामुळे सरकारला कधी नाही ते माघार घ्यावी लागली आणि एका मंत्र्याचा बळी द्यावा लागला ही गोष्ट अद्यापही भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांना पचलेली नाही आणि कोणत्या ना कोणत्या कारणाने त्यांची याबाबतची मळमळ बाहेर येताना दिसत आहे. त्यातून नवनवीन वाद निर्माण होत आहेत आणि सरकारची प्रतिमा अधिकच नकारात्मक आणि मलीन होऊ पहात आहे.

डॉ. मनमोहन सिंग पंतप्रधान असताना 2005 मध्ये त्यांनी लोकसभेमध्ये 1984 मध्ये झालेल्या शीख विरोधी दंग्यांबद्दल जाहीर माफी मागितली होती. साहजिकच एखाद्या घटनेबद्दल सरकारने माफी मागणे म्हणजे काही वेगळी गोष्ट आहे असे नाही. उलट अनेक वेळा अशा प्रकारच्या माफीमुळे विषयाला पूर्णविराम मिळतो.

अधिक चांगल्या गोष्टींवर लक्ष केंद्रित करता येते. म्हणूनच राजधानीत जंतर-मंतर येथे लोकशाही मार्गाने आंदोलन करर्णाया आंदोलकांबाबत जर काही चुकीच्या गोष्टी घडल्या असतील, तर त्याबाबत माफी मागणे सरकारला अवघड वाटू नये. एका बाजूला जर पंतप्रधान त्यांच्याबाबत चुकीचे शब्दप्रयोग करर्णायांना माफ करत असतील, तर दुर्सया बाजूने आंदोलकांवर झालेल्या अत्याचाराबद्दलही मोदी यांनी माफी मागून विषय संपवण्याची हीच वेळ आहे. अन्यथा माफी विषयावरील हे राजकारण यापुढेही चालूच राहील.

पान १ वरून

## मनोज जरांगे शुक्रवारपासून...

तसेच 'सगेसोयरे' अध्यादेशाची अंमलबजावणी करून मराठा समाजाला ओबीसी प्रवगार्तून आरक्षण द्यावे, हैदराबाद व सातारा गॅझेटची अंमलबजावणी करावी, मराठा आंदोलकांवरील गुन्हे मागे घ्यावेत आणि मराठा समाजासाठी स्वतंत्र मंत्रालयाची स्थापना करावी, अशा विविध मागण्यांचाही त्यांनी पुनरुच्चार केला आहे. जरांगे पाटील यांचा दौरा पुढीलप्रमाणे

शुक्रवार, ७ ऑगस्ट रोजी अंतरवाली ते तुळजापूर. तुळजापूर येथे मुक्काम. शनिवार, ८ ऑगस्ट रोजी सोलापूर जिल्हा दौरा सकाळी १० वाजता वडाळा (ता. उत्तर सोलापूर), दुपारी ३ वाजता माढा, सायंकाळी ७ वाजता पंढरपूर (मुक्काम) रविवार, ९ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता

सरकोली (ता. पंढरपूर), दुपारी ३ वाजता सांगोला, सायंकाळी ७ वाजता आटपाडी (जि. सांगली). सोमवार, १० ऑगस्ट रोजी कवठे महांकाळ, बोरगाव (ता. वाळवा), कडेगाव. मंगळवार, ११ ऑगस्ट मायणी (ता. खटाव), मसूर (ता. कराड), कोल्हापूर येथे बैठक व मुक्काम. बुधवार, १२ ऑगस्ट रोजी पाटण (सातारा) येथे बैठका घेऊन दौऱ्याची सांगता करणार आहेत.

या दौऱ्यात मराठा आरक्षण, सगेसोयरे अंमलबजावणी, कुणबी प्रमाणपत्रे आणि समाजाच्या इतर प्रलंबित प्रश्नांवर थेट संवाद साधण्यात येणार असून, २९ ऑगस्टपासून होणाऱ्या आंदोलनाची दिशा आणि पुढील रणनीतीही समाजासमोर मांडली जाणार आहे. त्यामुळे या दौऱ्याकडे आणि प्रस्तावित आंदोलनाकडे राज्यभरातील मराठा समाजाचे लक्ष लागले आहे.

# आठवणीतले शिक्षणमहर्षी डॉ. डी.वाय.पाटील

## एका प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वाच्या सहवासाची अविस्मरणीय आठवण



शिक्षण, आरोग्य, क्रीडा आणि सामाजिक क्षेत्रात आपल्या दूरदृष्टीने अमूल्य योगदान देणारे शिक्षणमहर्षी, पद्मश्री पुरस्कार विजेते आणि माजी राज्यपाल डॉ. ज्ञानदेव यशवंतराव पाटील (डी. वाय. पाटील) यांच्या निधनाची बातमी मनाला चटका लावून गेली. एका साध्या ग्रामीण पार्श्वभूमीतून पुढे येत शिक्षणाच्या माध्यमातून समाज परिवर्तनाचे स्वप्न पाहणाऱ्या या महान व्यक्तिमत्त्वाने देशाच्या शैक्षणिक क्षेत्रात एक वेगळा आदर्श निर्माण केला.

काही व्यक्तींचे आयुष्य त्यांच्या कायार्मुळे मोठे होते; परंतु काही व्यक्ती आपल्या विचारांनी, माणुसकीने आणि प्रेरणादायी प्रवासाने अनेकांच्या मनात कायमचे स्थान निर्माण करतात. डॉ. डी. वाय. पाटील हे असेच एक व्यक्तिमत्त्व होते. त्यांचे नाव घेतले की डोळ्यासमोर उभे राहते ते केवळ विशाल शैक्षणिक साम्राज्य नव्हे, तर प्रत्येक विद्यार्थ्याच्या स्वप्नांवर विश्वास ठेवणारे, ग्रामीण भागातील तरुणांना संधी देणारे आणि शिक्षणाला समाज परिवर्तनाचे साधन मानणारे एक संवेदनशील नेतृत्व.

माझ्या आयुष्यात त्यांच्याशी आलेला संपर्क हा केवळ एका महान व्यक्तीची भेट नव्हती; तर एका दूरदर्शी विचारवंताचा सहवास, त्यांचा साधेपणा आणि समाजासाठी काहीतरी करण्याची तळमळ अनुभवण्याचा अविस्मरणीय प्रवास होता.

**एका छोट्याशा भेटीतून सुरू झालेला प्रेरणादायी प्रवास..**

वर्ष होते २०११. त्या काळात मी पुणे येथे कृषी क्षेत्रातील अग्रगण्य आणि नामांकित 'बळीराजा' मासिकामध्ये उपसंपादक म्हणून कार्यरत होतो. कृषी विषयांवरील लेखन, संशोधनात्मक माहितीचे संकलन, शेतकरी, संशोधक आणि कृषी क्षेत्रातील तज्ज्ञांशी संवाद साधण्याची संधी मला मिळत होती.

शेतीतील नवनवीन प्रयोग, कृषी तंत्रज्ञानातील बदल, शेतकऱ्यांच्या समस्या आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेतील विविध पैलू यांचा जवळून अभ्यास करण्याचा तो माझ्या आयुष्यातील अत्यंत समृद्ध आणि शिकवण देणारा काळ होता.

याच काळात एका अनपेक्षित भेटीतून माझ्या आयुष्यातील एक प्रेरणादायी अध्याय सुरू झाला. 'बळीराजा' मासिकाचे मुख्य संपादक श्री. प्रभाकर भोसले यांचे मित्र श्री. जे. बी. पाटील हे एकदा कार्यालयात भेटण्यासाठी आले होते. ती आमची पहिली भेट होती; मात्र त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील साधेपणा, बोलण्यातली आपुलकी आणि विचारांमधील प्रगल्भता यामुळे पहिल्याच भेटीत मनावर एक वेगळी छाप पडली.

यानंतर त्यांच्या भेटीगाठी वाढत गेल्या. कृषी, शिक्षण, समाजकारण आणि ग्रामीण विकास यांसारख्या विषयांवर त्यांच्याशी अनेकदा चर्चा होत असे. त्यांच्या अनुभवातून आणि विचारांतून प्रत्येक वेळी काहीतरी नवीन शिकण्याची संधी मिळत असे.

याच स्नेहपूर्ण संबंधातून पुढे मला शिक्षणमहर्षी डॉ. डी. वाय. पाटील यांच्यासारख्या महान व्यक्तिमत्त्वाच्या सहवासाचा अमूल्य योग आला.

**राज्यपाल पदावरील व्यक्तिमत्त्वातील साधेपणाचा अनुभव...**

१९ मार्च २०११ चा दिवस. जे. बी. पाटील यांच्या माध्यमातून डॉ. डी. वाय. पाटील यांची भेट झाली तेव्हा ते त्रिपुराचे राज्यपाल होते. पुणे येथील त्यांच्या निवासस्थानी झालेली ती भेट माझ्यासाठी अत्यंत विशेष होती. मनात एक वेगळीच उत्सुकता होती. एका राज्याच्या राज्यपालांना भेटण्याचा हा माझ्या आयुष्यातील पहिलाच प्रसंग होता. मात्र प्रत्यक्ष भेटीत काही क्षणांतच पदाची औपचारिकता दूर झाली. कारण समोर होते एक अत्यंत साधे, नम्र आणि माणुसकी जपणारे व्यक्तिमत्त्व. त्यांनी अत्यंत आपुलकीने संवाद साधला. शिक्षण, कृषी आणि समाजाच्या विकासाविषयी त्यांची असलेली आस्था त्यांच्या प्रत्येक शब्दातून जाणवत होती. माझ्या शैक्षणिक प्रवासाबद्दल त्यांनी विशेष रस घेतला. मी महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथून उद्यानविद्या विषयात एम.एस्सी. पूर्ण केली आहे, हे समजल्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद दिसला.

**कृषी क्षेत्राबद्दल बोलताना त्यांनी व्यक्त केलेला विचार आजही माझ्या मनात कोरलेला आहे—**

'कृषी क्षेत्रातील शिक्षित तरुणांनी केवळ स्वतःच्या प्रगतीचा विचार न करता शेतकरी आणि समाजाच्या विकासासाठी योगदान दिले पाहिजे.'

या एका विचारातून त्यांची कृषी शिक्षणाबद्दलची आस्था आणि ग्रामीण भारताच्या विकासाची तळमळ स्पष्ट होत होती.

मी सोलापूर जिल्ह्यातील सांगोला येथील असल्याचे समजल्यानंतर त्यांनी लोकनेते गणपतराव देशमुख यांच्या आठवणी सांगितल्या. साधेपणा, जनतेशी असलेली नाळ आणि समाजसेवेची वृत्ती याबद्दल त्यांनी व्यक्त केलेला आदर मला विशेष भावला.

**बिहार राजभवनातील अविस्मरणीय अनुभव**

आयुष्यात काही क्षण असे असतात की ते केवळ आठवणी राहत नाहीत, तर ते आपल्या व्यक्तिमत्त्वाला नवी दिशा देणारे अनुभव बनतात. माझ्या आयुष्यातील असाच एक प्रसंग म्हणजे बिहार राजभवनातील प्रजासत्ताक दिन सोहळ्याचा अनुभव.

सन २०१४ मध्ये डॉ. डी. वाय. पाटील हे बिहारचे राज्यपाल म्हणून कार्यरत असताना श्री. जे. बी. पाटील यांच्या माध्यमातून मला पाटणा येथे आयोजित प्रजासत्ताक दिनाच्या मुख्य सोहळ्यास उपस्थित राहण्याची संधी मिळाली. कोलकाता येथून रेल्वेने प्रवास करून २५ जानेवारी रोजी सकाळी मी पाटणा येथे पोहोचलो. राजभवनाची गाडी मला घेण्यासाठी आली होती. एका सामान्य कृषी क्षेत्राशी जोडलेल्या व्यक्तीला देशाच्या एका राज्याच्या राजभवनात अतिथी म्हणून मिळालेला हा सन्मान माझ्यासाठी अत्यंत भावनिक आणि अभिमानाचा क्षण होता. राजभवनातील दोन दिवसांचा मुक्काम हा आयुष्यातील अविस्मरणीय अनुभव ठरला. राजभवन परिसरातील फेरफटका, लेडी गव्हर्नर यांच्यासोबतचा भोजन कार्यक्रम, विविध मान्यवरांच्या भेटी आणि २६ जानेवारी रोजी गांधी मैदानावर झालेला प्रजासत्ताक दिन सोहळा आजही डोळ्यासमोर उभा राहतो. त्या वेळी तत्कालीन मुख्यमंत्री श्री. नितीश कुमार यांच्याशी संवाद साधण्याची मिळालेली संधी माझ्यासाठी आत्मविश्वास वाढवणारी ठरली. या संपूर्ण अनुभवातून एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली— 'मोठी पदे व्यक्तीला मोठे बनवत नाहीत; तर मोठे विचार, नम्रता आणि माणुसकीची भावना व्यक्तीला महान बनवते.'

**शिक्षणाचा वटवृक्ष उभारणारे द्रष्टे नेतृत्व...**

डॉ. डी. वाय. पाटील यांनी शिक्षणाला केवळ संस्था उभारण्याचे माध्यम मानले नाही, तर समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन म्हणून पाहिले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या संधी मिळाव्यात, सामान्य कुटुंबातील मुलांनी मोठी स्वप्ने पाहावीत आणि ती पूर्ण करण्यासाठी त्यांना व्यासपीठ मिळावे, ही त्यांची आयुष्यभराची भूमिका होती. वैद्यकीय, अभियांत्रिकी, कृषी, व्यवस्थापन, आरोग्य आणि क्रीडा क्षेत्रात त्यांनी उभारलेल्या संस्था आज हजारो विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा देत आहेत. प्रत्येक विद्यार्थी हा भविष्यातील भारताचा निमार्ता आहे, या विश्वासाने त्यांनी शिक्षण क्षेत्रात कार्य केले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची सर्वात मोठी वैशिष्ट्ये म्हणजे मोठेपणातही टिकवून ठेवलेली साधेपणाची भावना. मोठ्या पदावर असूनही सामान्य माणसाशी संवाद साधण्याची त्यांची शैली, प्रत्येकाच्या प्रयत्नांचा आदर करण्याची वृत्ती आणि तरुणांना प्रोत्साहन देण्याची त्यांची सवय मनाला भावणारी होती.

आज ते आपल्यात नाहीत, ही जाणीव मनाला वेदना देते. मात्र त्यांनी निर्माण केलेली शिक्षणाची परंपरा, विद्यार्थ्यांवरील विश्वास आणि समाजसेवेची भावना पुढील अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहील. व्यक्ती जाते, पण विचार आणि कार्य अमर राहते. शिक्षणमहर्षी डॉ. डी. वाय. पाटील यांनी ज्ञानाचा जो दीप प्रज्वलित केला आहे, तो सदैव तेवत राहील. त्यांच्या स्मृती हजारो विद्यार्थ्यांसाठी, शिक्षकांसाठी आणि समाजासाठी प्रेरणेचा अखंड स्रोत राहतील.

अशा या महान शिक्षणमहर्षींना माझी विनम्र श्रद्धांजली...
भावपूर्ण अभिवादन...

**- डॉ. नितीन बी. उबाळे**
प्राचार्य, आर्या कृषी महाविद्यालय, मानेगाव,
ता. माढा, जि. सोलापूर
मो. 9975678175

## महिला हॉस्पिटल-विमानतळ-साखर कारखाना रस्ता दर्जेदार व सर्व सुविधायुक्त करा- महापौर कोंड्याल



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महिला हॉस्पिटल ते विमानतळ ते साखर कारखाना या शहरातील महत्त्वाच्या रस्त्याच्या विकासकामाबाबत महापौर विनायक कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली महापौर कार्यालयात आढावा बैठक पार पडली. या बैठकीत रस्त्याचे काम सुरु असून पाणीपुरवठा, ड्रेनेज, स्टॉर्म वॉटर ड्रेन, वीजवाहिन्या तसेच इतर भूमिगत सुविधांची कामे पूर्ण करून भविष्यात रस्ता पुन्हा खोदण्याची वेळ येऊ नये, यासाठी सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. संबंधित विभागांच्या संयुक्त पाहणीनंतर एमएसआयडीसीकडे पाठविण्यात आलेल्या पत्रातील सूचनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. महिला हॉस्पिटल ते साखर कारखाना या मार्गावरील विद्यमान ड्रेनेज लाईन, ५०० मिमी व्यासाची पिण्याच्या पाण्याची मुख्य जलवाहिनी, स्टॉर्म वॉटर ड्रेनेज तसेच रस्त्याच्या कनेक्टिव्हिटीसंदभार्तील आवश्यक बाबींचा आढावा घेण्यात आला.

महापौर विनायक कोंड्याल यांनी सांगितले की, हा रस्ता शहराच्या वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचा असून भविष्यात नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये, यासाठी सर्व विभागांनी एकत्रित नियोजन करून काम करावे. रस्ता तयार झाल्यानंतर पुन्हा खोदकामाची आवश्यकता निर्माण होणार नाही, याची दक्षता घेणे आवश्यक आहे. तसेच नागरिकांना दर्जेदार, सुरक्षित व दीर्घकाळ टिकणारा रस्ता करण्यात यावा.

बैठकीत उपमहापौर सौ. ज्ञानेश्वरी देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे, महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, एमएसआयडीसीचे कार्यकारी अभियंता उमेश झगडे, उपायुक्त गिरीश पंडित, नगरसेवक सात्विक बडवे, शिवाजी वाघमोडे, वैभव हत्तुरे, दीपक जमादार, जयकुमार माने, अझर हुंडेकरी, अझरुद्दीन जाहगीरदार, नगरसेविका संगीता जाधव, आनीसा मोगल, सफिया चौधरी तसेच एमएसआयडीसीचे अधिकारी प्रवीण जोशी, सय्यद पिरजादे, उपस्थित होते.

यावेळी सार्वजनिक आरोग्य अभियंता वेंकटेश चौबे, उपअभियंता नीलकंठ मठपती, कार्यकारी अभियंता राजेश परदेशी, सहाय्यक अभियंता महादेव इंगळे यांच्यासह संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी कामाच्या तांत्रिक बाबी, आवश्यक सुधारणा आणि समन्वयाबाबत सादरीकरण केले. बैठकीत महिला हॉस्पिटल ते विमानतळ ते साखर कारखाना या मार्गावरील ड्रेनेज लाईन, पिण्याच्या पाण्याची मुख्य जलवाहिनी, स्टॉर्म वॉटर ड्रेनेज, रस्त्यांची कनेक्टिव्हिटी, चौकांचे नियोजन तसेच भविष्यातील वाढती वाहतूक लक्षात घेऊन आवश्यक सुधारणा करण्याबाबत चर्चा करण्यात आली. सर्व संबंधित विभागांनी वेळबद्ध नियोजन करून कामे पूर्ण करण्याच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या. महापौर विनायक कोंड्याल यांनी या प्रकल्पाचे काम उच्च दर्जाचे, नागरिकाभिमुख आणि दीर्घकालीन दृष्टीकोन ठेवून पूर्ण करण्यात यावे, तसेच प्रत्येक टप्प्यावर संबंधित लोकप्रतिनिधी व विभागांनी समन्वय ठेवून काम करावे, असे निर्देश बैठकीत दिले.

## पूराचा विळखा कायम; पंढरपूरसह...

गेले आहेत. आळगे बंधाऱ्यावरून ७० हजार क्यूसेक वेगाने पाणी वाहत होते, सध्या गावांना तात्काळ धोका नसून नागरिकांनी प्रशासनाच्या अधिकृत सूचनांचेच पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

**भीमा नदीत ५१,६०० क्यूसेकने विसर्ग सुरू**

पुणे जिल्ह्यातील पाणलोट क्षेत्रातून होणाऱ्या पाण्याच्या आवकेमुळे उजनी धरण ९७.१३ टक्के भरले आहे. धरणात सोमवारी (ता.३) ५२.०४ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा झाला असून, पूरनियंत्रणासाठी धरणाचे दरवाजे उघडून भीमा नदीपात्रात एकूण ५१,६०० क्यूसेक वेगाने विसर्ग सोडण्यात येत आहे. गेल्या वर्षी आजच्या दिवशी (३ ऑगस्ट) उजनी धरणात ५२.६३ टीएमसी (९८.२३टक्के) उपयुक्त पाणीसाठा होता आणि पाणीपातळी ४९६.७५० मीटर होती. गतवर्षीच्या तुलनेत यंदाही धरण वेगाने पूर्ण क्षमतेने भरण्याच्या मार्गावर आहे. नागरिकांनी आणि शेतकऱ्यांनी नदीपात्रात उतरू नये, तसेच जनावरांना सुरक्षित स्थळी ठेवावे, असे आवाहन जलसंपदा विभागाकडून करण्यात आले आहे.

## माविम सोलापूर जिल्हा कार्यालयाचा राज्यात द्वितीय क्रमांक

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) यांच्या सन २०२५-२६ या वर्षाच्या राज्यस्तरीय वार्षिक आढावा बैठकीचे आयोजन दि. ३० व ३१ जुलै २०२६ रोजी मुंबई येथे करण्यात आले. माविमच्या व्यवस्थापकीय संचालक श्रीमती राजलक्ष्मी शहा (भा.प.से.) यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली.

यावेळी महाव्यवस्थापक (प्रकल्प) महेंद्र गमरे, महाव्यवस्थापक (वित्त व प्रशासन) अशोक फळणीतकर, व्यवस्थापक श्रीमती रूपा मिस्त्री, मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्रीमती राखी मिराशी, व्यवस्थापक श्रीमती गौरी दोंदे तसेच मुख्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

राज्यातील सर्व जिल्हा कार्यालयांच्या सन २०२५-२६ मधील कामगिरीचा आढावा घेऊन मूल्यांकन करण्यात आले. अधिक व्याप्ती (Heavy Loaded) प्रवर्गात माविम सोलापूर जिल्हा कार्यालयाने राज्यात द्वितीय क्रमांक मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले. या प्रवर्गात अमरावती जिल्ह्याने प्रथम, तर वाशीम आणि यवतमाळ जिल्ह्यांनी संयुक्त तृतीय क्रमांक पटकावला.

याचबरोबर, माविम सोलापूर अंतर्गत कार्यरत सिद्धेश्वर लोकसंचलित साधन केंद्र (CMRC), शेटफळ, ता. मोहोळ याची पुणे विभागातील उत्कृष्ट साधन केंद्र म्हणून निवड करण्यात आली.

या दोन्ही पुरस्कारांचे वितरण व्यवस्थापकीय संचालक श्रीमती राजलक्ष्मी शहा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माविम सोलापूर जिल्हा कार्यालयाच्या



वतीने जिल्हा समन्वय अधिकारी मन्सुर पटेल, विभागीय सल्लागार विलास बच्चे, विभागीय व्यवसाय विकास सल्लागार सिद्धाराम माशाळे तसेच दीपक टेकाळे, परमेश्वर इंगळे आणि राजकुमार पवार यांनी सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र स्वीकारले.

सिद्धेश्वर लोकसंचलित साधन केंद्राच्या वतीने उपाध्यक्षा श्रीमती संगीता सावंत, व्यवस्थापक नितीन साठे आणि जिल्हा समन्वय अधिकारी मन्सुर पटेल यांनी पुरस्कार स्वीकारला.

**माविम सोलापूरची उल्लेखनीय कामगिरी**

माविम सोलापूर जिल्हा कार्यालयामार्फत नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्प आणि महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM) अंतर्गत जिल्ह्यात ८,८५० महिला बचत गटांची स्थापना करण्यात आली असून त्यामधून सुमारे ९० हजार महिलांचे संघटन झाले आहे.

जिल्ह्यात २२ लोकसंचलित साधन केंद्रे (CMRC) कार्यरत असून त्यांच्यामार्फत महिलांच्या आर्थिक व सामाजिक सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

सन २०२५-२६ मध्ये या साधन केंद्रांमार्फत ३,१७७ बचत गटांना विविध बँकांद्वारे सुमारे १७२ कोटी रुपयांचे कर्ज उपलब्ध करून देण्यात आले. तसेच ६५० महिलांना सुमारे ४.५ कोटी रुपयांचे वैयक्तिक व्यवसाय कर्ज उपलब्ध करून देण्यात आले.

याशिवाय, नवतेजस्विनी प्रकल्पांतर्गत ३४ उपप्रकल्प, SMART प्रकल्पांतर्गत १५ शेतकरी उत्पादक कंपन्या व १५ प्रकल्प, मॅग्नेट प्रकल्पांतर्गत १ उपप्रकल्प, तसेच वॉटर व GTM प्रकल्पांची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे.

या सर्व योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीची दखल घेत माविम मुख्यालय, मुंबई यांनी माविम सोलापूर जिल्हा कार्यालयाची राज्यातील द्वितीय क्रमांकासाठी निवड केली.

**सर्वांच्या सामूहिक प्रयत्नांचे यश**

या यशामागे माविम सोलापूर जिल्हा कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी, तालुका अभियान कक्ष, जिल्ह्यातील सर्व लोकसंचलित साधन केंद्रांचे पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य, कर्मचारी, CRP, पुणे विभागातील वरिष्ठ अधिकारी तसेच माविम मुख्यालयातील सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन आणि सहकार्य मोलाचे ठरले आहे.

**- मन्सुर पटेल,** जिल्हा समन्वय अधिकारी
महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम), सोलापूर

## वात्रटिका

### हतबल देव

भक्तांनी भक्तीभावाने
देवापुढे भरला दान गल्ला...
लक्ष ठेवून होते ते सेवक
आणि त्यावरच मारला डल्ला...
देवालाही नाही देखवले
त्यांने डोळे मिटून घेतले...
राम, गणपती आणि मामा
सगळ्यांना टगे भेटले...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# MPSC, MHT-CET घोटाळ्याप्रकरणी संभाजी ब्रिगेडचे निवेदन

## ऑनलाइन परीक्षा रद्द करण्याची मागणी

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** MPSC पेपरफुटी, टलळ-उएळ परीक्षा घोटाळा, शिक्षक पात्रता परीक्षा (TET) कायमस्वरूपी रद्द करणे तसेच सर्व भरती व प्रवेश प्रक्रिया ऑनलाइनऐवजी ऑफलाइन पद्धतीने घेण्यात याव्यात, या प्रमुख मागण्यांसाठी संभाजी ब्रिगेडच्या वतीने निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, राज्यात मागील काही वर्षांपासून MPSC, MHT-CET, NEET, औषध निर्माणशास्त्र परीक्षा आदी विविध स्पर्धा परीक्षांमध्ये सातत्याने पेपरफुटी व गैरव्यवहाराच्या घटना



घडत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांची मेहनत, वेळ आणि लाखो रुपयांचा खर्च वाया जात असून विद्यार्थी व पालकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

MHT-CET प्रवेश प्रक्रियेतील पर्सेंटाईल पद्धत ग्रामीण व गुणवंत विद्यार्थ्यांवर अन्याय करणारी असल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. ही पद्धत विशिष्ट घटकांना लाभदायक ठरत असून तिचा फेरविचार करण्याची मागणी करण्यात आली आहे.

शिक्षण व्यवस्थेतील भ्रष्टाचार आणि अनागोंदीमुळे विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आले असून सरकारने या विषयाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे. पेपरफुटी व गैरव्यवहारातील दोषींवर कठोर कारवाई करून पीडित विद्यार्थ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी संभाजी ब्रिगेडने केली आहे.

सरकारने तातडीने ठोस निर्णय घेतला नाही, तर यापेक्षा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे नेते तथा धाराशिव जिल्हा संपर्कप्रमुख सोमनाथ राऊत, शहराध्यक्ष प्रकाश ननवरे, उपाध्यक्ष सचिन चव्हाण, प्रसिद्धीप्रमुख नितीन मोहिते, जिल्हा उपाध्यक्ष अजयसिंह सौंदमळे, अंबादास सपकाळे, रमेश अण्णा जाधव, कल्याण गव्हाणे, प्रकाश व्यवहारे, प्रकाश डोंगरे, अजसिंग भोसले, अजय जाधव, विजय जाधव यांच्यासह संभाजी ब्रिगेडचे पदाधिकारी उपस्थित होते.

# ४९ ज्येष्ठ विधिज्ञांचे ४० तासांचे मध्यस्थी प्रशिक्षण यशस्वी

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** मुख्य मध्यस्थी देखरेख समिती, मुंबई उच्च न्यायालय यांच्या निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला ४० तासांचा मध्यस्थी प्रशिक्षण कार्यक्रम नियोजन भवन, सोलापूर येथे समारोप समारंभपूर्वक संपन्न झाला. या प्रशिक्षणामध्ये सोलापूर, अक्कलकोट आणि मोहोळ येथील ४९ ज्येष्ठ विधिज्ञांनी यशस्वीरीत्या सहभाग नोंदविला.

समारोप समारंभाच्या अध्यक्षस्थानी एम.सी.पी.सी., नवी दिल्लीचे वरिष्ठ प्रशिक्षक संजीव भालेराव होते. तर कार्यक्रमाचे आयोजक व संभाव्य प्रशिक्षक न्यायाधीश अमोलकुमार ए. देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मार्गदर्शन करताना संजीव भालेराव यांनी सांगितले की, मध्यस्थीच्या माध्यमातून प्रलंबित वाद सामोपचाराने निकाली काढण्यास मोठी चालना मिळेल. प्रशिक्षित मध्यस्थ न्यायव्यवस्थेवरील ताण कमी करण्यास आणि वाद तडजोडीने मिटविण्यास महत्त्वाची भूमिका बजावतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



अमोलकुमार ए. देशपांडे यांनी प्रशिक्षणाचा आढावा घेत सहभागींना मार्गदर्शन केले. तसेच प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष मनोज एस. शर्मा यांनी प्रशिक्षणार्थींना दिलेल्या शुभेच्छाही त्यांनी यावेळी व्यक्त केल्या.

प्रशिक्षणार्थींनी आपल्या मनोगतात ४० तासांच्या प्रशिक्षणामुळे व्यक्तिमत्त्व विकासासह व्यावसायिक कौशल्यांमध्ये भर पडल्याचे सांगितले. वकिली व्यवसायासोबत प्रशिक्षित मध्यस्थ म्हणून वाद सामंजस्याने सोडविण्यास तसेच प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी हे प्रशिक्षण अत्यंत उपयुक्त ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

समारोप समारंभात प्रशिक्षण पूर्ण केलेल्या सर्व ४९ विधिज्ञांना मान्यवरांच्या हस्ते प्रशिक्षण पूर्णत्वाची प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. तसेच सोलापूर, अक्कलकोट व मोहोळ बार असोसिएशनच्या प्रतिनिधींनी उत्कृष्ट प्रशिक्षण दिल्याबद्दल वरिष्ठ प्रशिक्षक संजीव टी. भालेराव आणि अमोलकुमार ए. देशपांडे यांचा शाल व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला.

या ४० तासांच्या मध्यस्थी प्रशिक्षण कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष मनोज एस. शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सचिव अमोलकुमार ए. देशपांडे यांच्या देखरेखीखाली जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूरच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. असे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अधिक्षक एस.ए.जी.नदाफ यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

# प्रशासनाच्या मनमानी कारभाराविरोधात सावंत यांचे आमरण उपोषण

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** नातेपुते शहरातील जनतेला अनेक मूलभूत सुविधा पासून वंचित राहावे लागत आहे अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. यामध्ये वीजपुरवठा पाणीपुरवठा पालखी सोहळा खर्च नवीन घरपट्टी कर आकारणी अपूर्ण बंदिस्त गटारीची कामे अशा अनेक न होणारे विकास कामाबाबत नातेपुते येथील सामाजिक कार्यकर्ते विनायक सावंत यांनी नातेपुते येथील पालखी मैदान या ठिकाणी आमरण उपोषणास सोमवार दिनांक ३ ऑगस्ट रोजी सुरूवात केली आहे.विनायक सावंत यांनी केलेल्या प्रमुख मागण्यामध्ये महावितरणचा निष्काळजीपणा : पालखी सोहळ्यात वीज नियोजन अपयशी ठरल्याने नातेपुते महावितरणचे जबाबदार उप कार्यकारी



अभियंता व जबाबदार अधिकारी यांना तात्काळ निलंबित करा., पालखी सोहळ्यात पिण्याच्या व वापरण्याच्या पाण्याचे नियोजन कोलमडल्याने नगरपंचायत मुख्याधिकारी व जबाबदार अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करा. नातेपुते पाणीपुरवठा तलावाचे खोलीकरण व रुंदीकरण तात्काळ सुरू करा.पालखी सोहळा २०२६ मधील ५५ लाख रुपयांच्या संशयास्पद खर्चाची सखोल चौकशी करा. नातेपुते नगरसेवकांचा विरोध असताना लादली जाणारी नवीन कर आकारणी तात्काळ रद्द करा. नातेपुते शहरातील नागरिकांच्या प्रलंबित तक्रारी व विकासकामांवर नातेपुते नगरपंचायत ने तात्काळ कार्यवाही करावी. राज्यमार्ग क्र. १२४ (दहिगाव रोड) येथील अपूर्ण बंदिस्त गटाराचे काम सा.बां.विभाग अकलूज किंवा नातेपुते नगरपंचायत ने तात्काळ सुरू करावे. नातेपुते-पिरळे रोडचे राहिलेले काम तात्काळ सुरू करावे. पालखी मार्ग (पुणे-पंढरपूर रोड) बंदिस्त गटार काम तात्काळ सुरू करावे. वालचंदनगर ३३ केव्ही वीजवाहिनी तात्काळ सुरू करावी. नातेपुते शहरातील वीज तांत्रिक सर्वेक्षण व आवश्यक सुधारणा-उपाययोजनांचा सविस्तर अहवाल मिळावा. नातेपुते शहरातील सतत खंडित होणारी वीज,तात्काळ सुरळीत करावी. अशा विविध मागण्यांसाठी विनायक सावंत यांनी गेले दोन दिवसापासून आमरण उपोषणास सुरुवात केली आहे. अनेक सामाजिक राजकीय लोक त्या ठिकाणी येऊन पाठिंबा देत आहेत. त्यामुळे वरील समस्या बाबत केलेल्या आमरण उपोषणाचा संबंधित वरिष्ठ अधिकारी काय निर्णय घेणार? कुचकामी अधिकाऱ्यांवर कारवाई होणार का? नातेपुते नागरिकांच्या समस्या मिटणार का? याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

सांगोले नगरपरिषद, सांगोले,जि.सोलापूर

**दूरध्वनी क्र.(०२१८७)२२११७४/२२००१८.टोल फ्री क्रमांक-१८००२३३२१९०.** Email- comcsangola@gmail.com,

जा.क्र.सांनपा/पा.पु/कावि-९/आरआर/३९५४/२६ दि. ०४/०८/२०२६

**जाहीर निविदा प्रसिध्दीकरण**

सांगोले नगरपरिषदेकडील पाणीपुरवठा विभागासाठी खाली नमुद केलेल्या कामासाठी अनुभवी व नोंदणीकृत मक्तेदार यांचेकडून सिलबंद निविदा मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | अंदाजपत्रकीय रक्कम | बयाणा रक्कम | फॉर्म किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | Cleaning of ESR by high pressure jet, saction machine with anti bacterial solution and UV rays. | ८.३४ लक्ष | ८५००/- | ५००/- |

१) निविदा फॉर्म विक्री व स्विकृतीची दिनांक ०५/०८/२०२६ ते दिनांक १३/०८/२०२६ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत.

२) निविदा लिफाफा क्र.१ व २ उघडण्याचा दिनांक १४/०८/२०२६ रोजी (शक्य असल्यास).

निविदा फार्म विक्री व स्विकृती तसेच नियम, अटी व शर्तीची माहिती उपरोक्त कालावधीत नगरपरिषदेकडील पाणीपुरवठा विभागामध्ये शासकीय सुट्टी वगळता कार्यालयीन वेळेत पहावयास/विक्रीस मिळतील.

सही/-
मुख्याधिकारी
सांगोला नगरपरिषद सांगोला

# मुख्यमंत्री सहाय्यता निधीमुळे शक्य झाले यकृत प्रत्यारोपण

## पत्नीच्या यकृतदानातून पतीला मिळाले नवजीवन

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** आर्थिक परिस्थिती प्रतिकूल असल्यामुळे यकृत प्रत्यारोपणाचा खर्च उचलणे अशक्य झाले होते. उपचारासाठी तब्बल २५ ते ३० लाख रुपयांची आवश्यकता असताना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी आणि टाटा ट्रस्टच्या आर्थिक मदतीमुळे अकोला येथील प्रशांत इंगळे (वय ४७) यांच्यावर मुंबईतील नानावटी रुग्णालयात यशस्वी यकृत प्रत्यारोपण करण्यात आले. या प्रत्यारोपण शस्त्रक्रियेत त्यांच्या पत्नी वर्षा इंगळे यांनी स्वतःच्या यकृताचा काही भाग दान करून पतीला नवजीवन दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून प्रशांत इंगळे यांच्यासाठी २ लाख रुपयांची मदत मंजूर करण्यात आली. तसेच मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धमार्दाय रुग्णालय मदत कक्षाच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे टाटा ट्रस्टकडून १९ लाख ६० हजार रुपयांची आर्थिक मदतही उपलब्ध झाली. त्यामुळे एकूण २१ लाख ६० हजार रुपयांचा निधी उभारला गेला आणि अत्यंत खर्चिक असलेले यकृत प्रत्यारोपण शक्य झाले.

प्रशांत इंगळे हे अकोला येथे केबल टाकण्याचे काम करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. त्यांच्या कुटुंबात वृद्ध आई-वडील, पत्नी, महाविद्यालयीन शिक्षण घेणारी मुलगी आणि दहावीत शिकणारा मुलगा आहे. सप्टेंबर-ऑक्टोबर २०२५ दरम्यान त्यांना पोटदुखीचा त्रास सुरू झाला. अकोला आणि नागपूर येथे झालेल्या वैद्यकीय तपासण्यांनंतर त्यांचे यकृत गंभीररीत्या निकामी होत असल्याचे निदान झाले. डॉक्टरांनी तातडीने यकृत प्रत्यारोपणाचा सल्ला दिला. मात्र, लाखो रुपयांचा उपचार खर्च कुटुंबाच्या आर्थिक क्षमतेबाहेर होता.

अशा कठीण परिस्थितीत पत्नी वर्षा इंगळे यांनी कुटुंबीयांसह अकोल्याच्या आमदारांची भेट घेतली. त्यांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीबाबत माहिती देत मुंबईत उपचारासाठी जाण्याचा सल्ला दिला. त्यानंतर इंगळे कुटुंबीयांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धमार्दाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांची भेट घेतली. नाईक यांनी प्रकरणाची तातडीने दखल घेत आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी तसेच टाटा ट्रस्टकडून आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी प्रभावी पाठपुरावा केला.

या आर्थिक सहाय्यामुळे २५ जून २०२६ रोजी मुंबईतील नानावटी रुग्णालयात यशस्वी यकृत प्रत्यारोपण करण्यात आले. शस्त्रक्रियेनंतर प्रकृतीत समाधानकारक सुधारणा झाल्याने १३ जुलै २०२६ रोजी प्रशांत इंगळे यांना रुग्णालयातून घरी सोडण्यात आले. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असून ते हळूहळू पूर्णपणे बरे होत आहेत.

वेळेवर मिळालेल्या आर्थिक मदतीमुळे आपल्याला नवजीवन मिळाल्याची भावना व्यक्त करत इंगळे कुटुंबीयांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धमार्दाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक तसेच टाटा ट्रस्ट यांचे मनःपूर्वक आभार मानले.

# संजय राऊत यांनी शब्द माघारी घ्यावेत - अशोक गायकवाड

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याबाबत शिवसेना (ठाकरे गट) खा. संजय राऊत यांनी केलेल्या वक्तव्याचा, अकलूज येथील भाजप नेते, माजी जिल्हा परिषद सदस्य अशोक गायकवाड यांनी, तीव्र शब्दांत निषेध व्यक्त करत, खासदार संजय राऊत यांनी शब्द माघारी घ्यावेत व माफी मागावी असे आवाहन प्रसार माध्यमांशी संवाद साधताना केले.

पत्रकारांशी बोलताना पुढे माजी जिल्हा परिषद सदस्य अशोक गायकवाड म्हणाले की, महाराष्ट्राला पुरोगामी विचारांची समृध्द परंपरा लाभली आहे. राजकीय सारीपाठावर खेळत असताना, आरोप प्रत्यारोप होत राहतात. कोणाची तरी हार जीत होतच असते.राजकीय परंपरेत कोणी कोणाचा कायमचा शत्रू नसतो किंवा कायमचा मित्रही नसतो.परंतु सध्या राज्याच्या राजकारणाची दिशा बदलत चालली आहे आणि हे खा.संजय राऊत यांच्या विधानावरून वाटत आहे. प्रसार माध्यमांशी संवाद



साधताना,ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या बद्दल अश्लील भाष्य करत, स्वतःच्या संस्काराचे दर्शन घडवले.ना. जयकुमार गोरे हे अभ्यासू आणि विकासाला चालना देणारे व्यक्तिमत्व आहे. आषाढी एकादशी निमित्त ना.गोरे यांनी पंढरपुरात केलेले नियोजनाबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनीही कौतुक केले. तीस ते पस्तीस लाख भाविक पंढरपुरात येऊन गेले.अशा कर्तृत्ववान व्यक्तिमत्वास सभ्यता सोडून बोलणे योग्य नाही. म्हणून खासदार संजय राऊत यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांची माफी मागावी व बोललेले शब्द माघारी घ्यावेत असे अशोक गायकवाड म्हणाले.

# सम्मेद शहा यांची आंतरराष्ट्रीय जैन संघटनेत प्रसिद्धी प्रमुखपदी निवड

**पापरी (कटूसत्य वृत्त):-** पापरी ता.मोहोळ येथील सम्मेद राजकुमार शहा यांची फेडरेशन ऑफ ऑफ हुमड जैन समाज या आंतरराष्ट्रीय स्तरावर काम करणाऱ्या जैन संघटनेच्या महाराष्ट्र-गोवा युवा प्रकोष्ट राज्य कार्यकारिणीत प्रसिद्धी प्रमुख म्हणून निवड करण्यात आली असून या निवडीची माहिती महाराष्ट्र-गोवा युवा प्रकोष्टचे राज्य अध्यक्ष संदेश गांधी यांनी दिली.



आज पर्यंत जैन समाजासाठी दिलेले योगदान, विविध धार्मिक व सामाजिक केलेली कार्ये याची दखल घेत ही निवड करण्यात आल्याचे संदेश गांधी यांनी सांगितले. लवकरच महाराष्ट्रासह इतर राज्यातील नूतन पदाधिकाऱ्यांचा शपथविधी समारोह इंदोर येथे संपन्न होणार आहे. ग्रामीण भागातून आंतरराष्ट्रीय दर्जाच्या संघटनेत निवड होऊन काम करण्याची संधी मिळाल्याने त्याचे सोने करेन असे सम्मेद शहा यांनी सांगितले.

या निवडीबद्दल भारत वर्षीय दिगंबर जैन तीर्थक्षेत्र कमिटीचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष व श्री सन्मती सेवा दलाचे संस्थापक मिहीर गांधी यांच्यासह सोलापूर, अकलूज, नातेपुते, करमाळा, बारामती येथील विविध जैन संघटनेचे पदाधिकारी,पापरी पंच क्रोशीतून शहा यांचे अभिनंदन होत आहे.

## Classified - छोटी जाहीरात

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर. **9420766666**

(सरकार मान्य)

### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी

**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**

**9822964815**
**9421984815**

झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे. संपर्क 9145451809 भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

### वर-वधू



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथ एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**


मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर

**उमेश माने**
मो. 9353370779

**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) ख्रिश्चन धर्मियांचा एक सण, ख्रिसमस २) डोके ३) गुणी, प्रामाणिक वृत्तीचा ४) दह्यात पाणी मिसळून हे तयार करतात ५) जेवणासाठी बसलेली रांग ६) हात ८) एक पक्षी ९) आश्चर्य १०) नगरचे माजी खासदार-*** विखे-पाटील ११) एक भारतीय गोलंदाज-यजुवेंद्र *** १२) शर्ट १३) इच्छा १४) दिलेले आश्वासन, वचन १५) लहान मूल १६) एक मराठी अभिनेत्री-*** प्रभुणे १७) वेडसर (हिंदीत) १८) शर्टची गळ्याभोवतीची पट्टी १९) धावपट्टू (इंग्रजीत) २१) पावसाची आतुरतेने वाट पाहणारा पक्षी २२) वस्तूंवर लावलेला टॅक्स, कर २३) कंबर (हिंदीत) २४) आत, आतील बाजूस (हिंदीत) २५) जवळ, समीप २६) खोलगट २७) काजूच्या जोडीचा एक पौष्टीक पदार्थ २८) दोन आणि अर्धा २९) शिवसेनेचे मुखपत्र ३०) पोट ३१) वायू, वारा ३२) कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेली शिक्षणसंस्था ३४) शपथ (हिंदीत) ३५) मनुष्य ३६) शंभर धावांचा टप्पा ३७) गाडीची गती ३८) गुलाम ३९) मनी नाही ** अन् देवा मला पाव

**आडवे शब्द :** १) उत्तर महाराष्ट्रातील एक जिल्हा ३) खा. उदयनराजे यांचा लोकसभा मतदारसंघ ५) बीडच्या एक नेत्या-*** मुंडे ७) वायर, धातूचा तंतू ८) लहान मुलाचा सांभाळ करणारे आई वडील, एक भाजी प्रकार ९) छोटे शहर ११) एक अंमली नशिला पदार्थ १२) पतीची दुसरी बायको १३) शर्टला बटण अडकविण्यासाठी केलेली खाच १४) स्तुती १५) ढग (हिंदीत) १६) वेळ (हिंदीत) १७) पैंजण (हिंदीत) १८) पूर्वीचा एक साथीचा रोग १९) एक अभिनेत्री-*** टंडन २०) हनुमानाच्या हातातील शस्त्र २१) वाहन चालविणारा २२) लालू प्रसाद यादव यांचा पक्ष-राष्ट्रीय *** दल २४) दोन्हीमधील तफावत २५) होकारच्या विरूध्दार्थी २६) विषमच्या विरूध्दार्थी २७) पाण्यावर तरंगणारा एक पक्षी २८) महाराष्ट्राचे एक नेते -*** पवार २९) शुगर, शर्करा ३०) मोठ्या मनाचा ३१) पडून राहिलेली जमीन ३२) वाळूवर रेषा काढून भविष्य जाणण्याची पध्दत ३३) धमकी देणे, संयम, धीर ३४) संरक्षक आवरण ३५) पत्राचा सुरूवातीचा मजकूर ३७) बैलाच्या नाकात घातलेली दोरी ३८) दान करण्याची वृत्ती ३९) शिजवलेला तांदूळ ४०) दोन नद्यांचा मिलाफ ४१) सशाची आणि याची शर्यतीची गोष्ट प्रसिध्द आहे ४२) जावकच्या विरूध्दार्थी शब्द

## सुडोकु - 21

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | 7 | 8 | 4 | 1 | | 2 | | |
| 5 | 6 | | | | 8 | | | |
| | | | 7 | 6 | | | | 1 |
| | | | 3 | | | 8 | | |
| | 3 | 2 | 1 | | | 6 | 9 | |
| | | 6 | 2 | 8 | 4 | 3 | 5 | 7 |
| | | 4 | | | | | | 5 |
| | 5 | | | 3 | 1 | 9 | 4 | 6 |
| 6 | 1 | | | | | 7 | | 8 |

# ‘Gen Z’ शेतकऱ्यांसाठी कृषी व्यवसाय संधी विषयक राष्ट्रीय परिसंवाद उत्साहात संपन्न



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सिंहगड इन्स्टिट्यूट, केगाव येथील सेंटर फॉर रिसर्च अँड टेक्नॉलॉजी डेव्हलपमेंट (CRTD) आणि ग्रीन एज फार्मर प्रोड्युसर कंपनी लिमिटेड (GEFPCL), सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ‘Gem Z शेतकऱ्यांसाठी कृषी व्यवसायाच्या संधी’ या विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय परिसंवाद उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी CRTDचे संशोधन संचालक प्रा. डॉ. एस. एच. पवार होते. राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र (ICAR-NRCP), सोलापूरचे संचालक डॉ. राजीव ए. मराठे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. प्रमुख वक्ते म्हणून बँक ऑफ इंडियाचे माजी क्षेत्रीय महाव्यवस्थापक मुकुंद कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. प्रारंभी प्रा. डॉ. अमर सुपाते यांनी प्रास्ताविक केले, तर शिवाजीराव नलावडे यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. यशपाल खेडकर यांनी केले.

संशोधन, आधुनिक तंत्रज्ञान, मूल्यवर्धन आणि एफपीओच्या माध्यमातून कृषी व्यवसायाला नवी दिशा देत शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी बाजारपेठाभिमुख शेतीची गरज असल्याचे प्रतिपादन मान्यवरांनी केले. हा कार्यक्रम कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या नेतृत्वाखाली प्राचार्य डॉ शंकर नवले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

बीजभाषणात मुकुंद कुलकर्णी म्हणाले, ‘आज नाचणीसारखी भरड धान्ये खाण्याचा सल्ला दिला जातो; मात्र त्याचे उत्पादन पुरेसे होत नाही. परिणामी ही धान्ये सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर जाऊन श्रीमंतांच्या ताटात पोहोचत आहेत. भरड धान्यांचे उत्पादन वाढविण्यासाठी शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करून मूल्यवर्धित कृषी व्यवसायाकडे वळण्याची गरज आहे.’ त्यांनी एफपीओ, कृषी प्रक्रिया उद्योग आणि बाजारपेठेतील संधींचाही आढावा घेतला.

उद्घाटक डॉ. राजीव मराठे यांनी संशोधनाधारित शेती, डाळिंब उत्पादनातील नव्या संधी आणि कृषी क्षेत्रातील तांत्रिक प्रगतीची माहिती दिली. अध्यक्षीय समारोपात प्रा. डॉ. एस. एच. पवार यांनी कृषी संशोधन, तंत्रज्ञान विकास, मूल्यवर्धन आणि शाश्वत शेतीच्या माध्यमातून युवकांनी कृषी उद्योजकतेकडे वाटचाल करण्याचे आवाहन केले.

परिसंवादात तीन तांत्रिक सत्रांद्वारे मिलेट्स, रेशीम उद्योग, डाळिंबातील मूल्यवर्धन, ‘Gen Z’ शेतकऱ्यांसाठी व्यवसाय संधी, शाश्वत शेती, एफपीओची भूमिका, ATMA SMART प्रकल्प, शासनाच्या विविध कृषी योजना, जैविक निविष्ठा, बायोमास आधारित उद्योग, ग्रामीण विकासातील कृषी उद्योजकता आदी विषयांवर विविध संशोधन संस्था, कृषी विद्यापीठे आणि उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांनी सखोल मार्गदर्शन केले.

या राष्ट्रीय परिसंवादाला शेतकरी, एफपीओ प्रतिनिधी, कृषी उद्योजक, संशोधक, विद्यार्थी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सिंहगड इन्स्टिट्यूटच्या उष्मायन विभाग, GEFPCL आणि सर्व सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# महादेव कोगनुरे यांच्या लक्ष्मीकांत एंटरप्राईजेसच्या YO BYKES शोरूमचे दिमाखदार उद्घाटन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** पर्यावरणपूरक आणि अत्याधुनिक इलेक्ट्रिक वाहनांचा प्रसार करण्याच्या उद्देशाने जनसेवक महादेव कोगनुरे यांच्या लक्ष्मीकांत एंटरप्राईजेसच्या YO BYKES इलेक्ट्रिक दुचाकी शोरूमचे उद्घाटन आज उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.

या प्रसंगी सोलापूरचे माजी खासदार तथा मार्गदर्शक डॉ. जय सिद्धेश्वर महास्वामीजी यांच्या शुभहस्ते शोरूमचे उद्घाटन करण्यात आले. त्यांनी पर्यावरण संरक्षण, ऊर्जा बचत आणि शाश्वत विकासासाठी इलेक्ट्रिक वाहनांचे वाढते महत्त्व अधोरेखित करत या नव्या उपक्रमास शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमास महादेव कोगनुरे, त्यांचे सहपरिवार, नातेवाईक, सागर सिमेंटचे अधिकारी, अतिथी प्युअर व्हेजचे कर्मचारी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर आणि हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.






वाढत्या इंधनदरांच्या पार्श्वभूमीवर कमी खर्च, अत्यल्प देखभाल आणि प्रदूषणमुक्त प्रवासामुळे इलेक्ट्रिक दुचाकींची मागणी सातत्याने वाढत आहे. या पार्श्वभूमीवर O BYKES ग्राहकांना आधुनिक तंत्रज्ञान, सुरक्षितता आणि विश्वासार्ह सेवा उपलब्ध करून देणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

यावेळी लक्ष्मीकांत एंटरप्राईजेसचे सर्वेसर्वा महादेव कोगनुरे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, "या नव्या व्यवसायात काम करण्याची संधी मिळणे ही माझ्यासाठी अभिमानाची बाब आहे.

या उपक्रमासाठी मला विश्वासाने संधी दिल्याबद्दल कंपनीचे तसेच विशेषतः सिमेंट क्षेत्रातील आमचे मार्गदर्शक आणि YO BYKESचे सोलापूर जिल्हा वितरक बाळासाहेब मुंदडा यांचे मी मनःपूर्वक आभार व्यक्त करतो. त्यांच्या मार्गदर्शनामुळे आणि सहकायार्मुळे हा उपक्रम साकार झाला असून ग्राहकांना दर्जेदार सेवा देण्यासाठी आम्ही सदैव कटिबद्ध राहू."

कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. उपस्थितांनी नव्या शोरूमला शुभेच्छा देत. लक्ष्मीकांत एंटरप्राईजेसच्या या नव्या उपक्रमाच्या यशस्वी वाटचालीस शुभेच्छा व्यक्त केल्या.

# शंकरनगर येथे रत्नाई पारंपारिक नागपंचमी समुहनृत्य स्पर्धेचे आयोजन

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज व प्रताप क्रीडा मंडळ शंकरनगर अकलूज यांच्या संयुक्त विद्यमाने दि.११ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी २ वाजता स्मृतीभवन शंकरनगर येथे रत्नाई पारंपारिक नागपंचमी समुह नृत्य स्पर्धेचे आयोजन केले आहे.

ग्रामीण कला, क्रीडा व संस्कृतीचे जोपासक जयसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील, प्रताप क्रीडा मंडळाच्या अध्यक्षा कु. स्वरूपाराणी मोहिते पाटील, अकलूज नगरपरिषदेचे नगरसेवक व युवा नेते सयाजीराजे मोहिते पाटील यांच्या नियोजनातून मुलींच्या पारंपारिक गीतांचा रत्नाई पारंपारिक नागपंचमी समुहनृत्य स्पर्धेचे आयोजन केले आहे.





महाराष्ट्रातील लोप पावत चाललेले सण, उत्सव, पारंपरिक कला आणि खेळ यांचा समृद्ध व सांस्कृतिक वारसा जतन व्हावा हा उद्देश या उपक्रमाचा आहे.

या स्पर्धेमध्ये सदाशिवराव माने विद्यालय अकलूज, जिजामाता कन्या प्रशाला अकलूज, महर्षी शंकरराव मोहिते प्रशाला यशवंतनगर, लक्ष्मीबाई कन्या प्रशाला यशवंतनगर, शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूज, श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील गृहविज्ञान महिला महाविद्यालय अकलूज, सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च शंकरनगर या सात शाखांचा सहभाग आहे.

प्रत्येक संघात सुमारे २० ते ५० कलाकार पारंपारिक गीतांचेच सादरीकरण करणार असून यासाठी त्यांना २० मिनिटांचा कालावधी देण्यात आला आहे. या स्पर्धेसाठी लाखो रुपयांची बक्षीसही ठेवण्यात आली आहेत. सदरची स्पर्धा ११ ऑगस्ट रोजी दुपारी २ ते ५ या वेळेत होणार असून ते केवळ निमंत्रितासाठी असून सर्वांसाठी याचे थेट प्रक्षेपण त्याच वेळी सुरू राहणार असल्याचेही आयोजकांनी सांगितले. यावेळी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव अभिजीत रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे पाटील, प्रताप क्रीडा मंडळाचे उपाध्यक्ष पोपट भोसले पाटील, सचिव बिभीषण जाधव उपस्थित होते.

# डॉ. मामासाहेब जगदाळे कृषी महाविद्यालयात क्रांतिसिंह नाना पाटील जयंती साजरी

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे कृषी महाविद्यालय, बार्शी येथे अभिवादन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. डी. जाधव हे होते.

प्रारंभी क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. जे. डी. जाधव यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या स्वातंत्र्यलढ्यातील अतुलनीय योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख केला. राष्ट्रसेवा, सामाजिक बांधिलकी आणि लोकहितासाठी कार्य करण्याची प्रेरणा त्यांच्या जीवनातून विद्यार्थ्यांनी घ्यावी, असे त्यांनी प्रतिपादन केले.

यावेळी विद्यार्थ्यांनीही क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या कार्य व विचारांवर मनोगत व्यक्त केले. दिप्ती वाघ यांनी आजच्या युवकांनी सामाजिक ऐक्य व राष्ट्रहिताची जपणूक करण्याचे आवाहन केले. साक्षी इनामे यांनी नाना पाटील यांनी स्थापन केलेल्या प्रतिसरकार आणि तुफान सेनेच्या कार्याचा आढावा घेत, "ही भूमी भारतीयांची आहे, इंग्रजांची नाही," हा त्यांचा लढाऊ




विचार विद्यार्थ्यांसमोर मांडला. प्रज्ञा जानराव यांनी त्यांच्या धैर्य, त्याग आणि लोकसेवेच्या कार्यातून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले, तर क्षितिजा पवार यांनी स्वातंत्र्यलढ्यातील त्यांच्या योगदानाचा गौरव करत विद्यार्थ्यांनी समाजहित व राष्ट्रहितासाठी कार्य करण्याची प्रेरणा घ्यावी, असे प्रतिपादन केले.

विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतात नाना पाटील यांनी इंग्रजांविरुद्ध सशक्त लढा उभारण्यासाठी 'तुफान सेना' स्थापन केली तसेच प्रतिसरकार उभारून स्वातंत्र्यलढ्याला नवी दिशा दिली, यावर प्रकाश टाकला. स्वातंत्र्यानंतर १९५७ च्या लोकसभा निवडणुकीत ते खासदार म्हणून निवडून गेले. संसदेत मराठी मातृभाषेत भाषण करणारे पहिले खासदार म्हणून त्यांचा गौरव केला जातो. तसेच शेतकऱ्यांवरील विवाहाचा अनावश्यक खर्च कमी व्हावा यासाठी त्यांनी 'गांधी विवाह' या साध्या विवाहपद्धतीचा प्रसार करून समाजासमोर आदर्श निर्माण केला, असेही विद्यार्थ्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. गणेश जाधव, प्रा. मिलन जायभाय, डॉ. एस. एस. शेंडे, डॉ. डी. बी. शिंदे, प्रा. विलास बोंगे, डॉ. एम. डी. गुरव, डॉ. एस. एस. कुलकर्णी, डॉ. ए. वाय. रणवरे तसेच प्रा. आशा आदलिंगे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नागेश जगताप यांनी केले, तर कु. साक्षी इनामे यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पढरपुरात विविध योजनांच्या 1 हजार 23 लाभांचे वितरण: तहसीलदार लंगुटे



**पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर येथे येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त रविवार दि.02 ऑगस्ट रोजी आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पंढरपूरात विविध योजनांच्या 1 हजार 23 लाभांचे वितरण करण्यात आले असल्याची माहिती तहसीलदार सचिन लंगुटे यांनी दिली.

यश पॅलेस, कराड रोड पंढरपूर येथे 252 पंढरपूर विधानसभा मतदासंघातील नागरिकांसाठी आयोजित केलेल्या शिबिरास आमदार समाधान आवताडे, प्रांताधिकारी सचिन इथापे, बी.आर. माळी, तहसीलदार सचिन लंगुटे, मदन जाधव, गटविकास अधिकारी अमोल जाधव, मुख्याधिकारी महेश रोकडे, तालुका कृषी अधिकारी सुर्यकांत मोरे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. एकनाथ बोधले तसेच पंढरपूर मंगळवेढा तालुक्यातील जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिकेचे पदाधिकारी व नायब तहसिलदार, मंडलाधिकरी, तलाठी आणि कर्मचारी उपस्थितीत होते.

या शिबिरामध्ये महसूल विभागासह विविध विभागांचे स्टॉल उभारण्यात आले होते. या माध्यमातून नागरिकांना विविध शासकीय योजना, सेवा व सुविधांची माहिती देण्याबरोबरच पात्र लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभाचे वितरण करण्यात आले. यावेळी 252 पंढरपूर विधानसभा मतदासंघातील पंढरपूर, मंगळवेढा तालुक्यातील नागरिकांना जिवंत सातबारा उतारे 310, राज्यातील महिलांना शेतकरी दर्जा देण्याबाबतचे प्रमाणत्र वाटप 42, मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते 07, राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण योजना 37, घरकुल लाभार्थ्यांच्या योजनेसाठी विशेष तरतूद 20, शेतीच्या कौटुंबिक वाटणीपत्रावरील नोंदणी फी माफ 13, राज्य शासकीय योजनांचा लाभ 265, स्थानिक स्वराज संस्थेच्या शासकीय योजनांचा लाभ 50, इतर विविध योजनांचे लाभ 279 असे एकूण 1 हजार 23 लाभ देण्यात लाभांचे वितरण करण्यात आले.

यावेळी बोलताना आमदार समाधान आवताडे यांनी शासनाच्या विविध योजना व उपक्रम नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी अशा शिबिरांची आवश्यकता असल्याचे सांगितले.

महसुली कामे तात्काळ मार्गी लागत असल्यामुळे नागरिक समाधान व्यक्त करीत असल्याचे सांगितले.

शासकीय योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत थेट पोहोचविणे, नागरिकांच्या विविध प्रशासकीय अडचणींचे निराकरण करणे आणि महसूल विभागाच्या सेवा सुलभ व गतिमान पद्धतीने उपलब्ध करून देणे, हा या समाधान शिबिराचा प्रमुख उद्देश असल्याचे उपविभागीय अधिकारी सचिन इथापे यांनी सांगितले.

यावेळी उपस्थित नागरिकांनी मोठ्या संख्येने भेट देऊन योजनांची माहिती घेतली. तसेच शासकीय योजनांसाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे व निकष याची माहिती ही नागरिकांनी घेतली.

शिबिरास विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या समाधान शिबिरामधून एकाच वेळी मोठ्या संख्येने पात्र लाभार्थ्यांना योजनांचा लाभ मिळाल्यामुळे लाभार्थ्यांमधून समाधान व्यक्त करण्यात आले.

# ईच्छा भगवंताची परिवाराकडून आ. सचिन कल्याणशेट्टी यांचा सत्कार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** श्रीक्षेत्र अक्कलकोट येथील ब्रह्मांडनायक श्री स्वामी समर्थ महाराजांच्या पवित्र भूमीचा सर्वांगीण विकास करून अक्कलकोटला जागतिक दर्जाचे तीर्थक्षेत्र म्हणून विकसित करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. अक्कलकोट विधानसभा मतदारसंघाचे पाणीदार आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करत मांडलेल्या 'श्री स्वामी समर्थ ग्रीन कॉरिडॉर' संकल्पनेला राज्य शासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यासाठी सुमारे ५०० कोटींचा विकास आराखडा तातडीने तयार करून शासनाकडे सादर करण्याचे आदेश दिल्याने लाखो स्वामी भक्तांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या ऐतिहासिक निर्णयाबद्दल ईच्छा भगवंताची परिवाराचे मार्गदर्शक तथा सोलापूर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक २२ चे भाजपा नगरसेवक किसन जाधव यांच्या नेतृत्वाखाली ईच्छा भगवंताची परिवाराच्या वतीने अक्कलकोट येथील संपर्क कार्यालयात आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी नगरसेवक किसन जाधव म्हणाले, श्री स्वामी समर्थ ग्रीन कॉरिडॉर हा



प्रत्येक स्वामी भक्ताच्या श्रद्धेशी जोडलेला ऐतिहासिक प्रकल्प आहे. या प्रकल्पामुळे देशभरातून येणाऱ्या लाखो भाविकांना सुरक्षित, सुलभ आणि आधुनिक दर्शन व्यवस्था उपलब्ध होईल. मंदिर परिसराचे सुशोभीकरण, पार्किंग, स्वच्छता, पायी चालणाऱ्या भाविकांसाठी स्वतंत्र मार्ग आणि अत्याधुनिक सुविधा यामुळे अक्कलकोटच्या धार्मिक वैभवात मोलाची भर पडणार आहे. आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांनी स्वामी भक्तांच्या भावनांचा आदर राखत घेतलेला हा पुढाकार कायम स्मरणात राहील. सत्काराला उत्तर देताना आमदार सचिन (दादा) कल्याणशेट्टी म्हणाले, श्री स्वामी समर्थ ग्रीन कॉरिडॉर हा केवळ बांधकामाचा प्रकल्प नाही, तर लाखो स्वामी भक्तांच्या श्रद्धेचा आणि विश्वासाचा सन्मान आहे. या माध्यमातून भाविकांना अधिक सुलभ, सुरक्षित आणि नियोजनबद्ध दर्शन व्यवस्था उपलब्ध होईल. अक्कलकोटमध्ये धार्मिक पर्यटनाला मोठी चालना मिळेल. त्यामुळे हॉटेल व्यवसाय, व्यापारी, वाहनचालक, लघुउद्योजक आणि स्थानिक नागरिकांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील. श्रीक्षेत्र अक्कलकोटचा सर्वांगीण विकास व्हावा या उद्देशाने आम्ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे हा प्रस्ताव मांडला आणि त्यांनी कोणताही विलंब न करता त्यास मंजुरी देऊन प्रकल्पाला गती दिली. यासाठी मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो.

तसेच ईच्छा भगवंताची परिवाराने माझा केलेला सन्मान हा माझ्यावरील प्रेमाचा आणि स्वामी भक्तांच्या आशीवार्दाचा स्वीकार असून, संपूर्ण परिवाराचे मी मनःपूर्वक आभार व्यक्त करतो. यावेळी सामाजिक कार्यकर्ते शिवराज गायकवाड, चेतन नागेश अण्णा गायकवाड, हुलगप्पा शासम, महादेव राठोड, पाटील, यल्लाप्पा शिवपुरे यांच्यासह ईच्छा भगवंताची परिवाराचे पदाधिकारी व स्वामी भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी हा प्रकल्प अक्कलकोटच्या धार्मिक, सामाजिक आणि आर्थिक विकासाला नवी दिशा देणारा ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.

# ग्रीन झोनमधील २ गुंठे क्षेत्रालाही बांधकाम परवाना द्या; अन्यथा १५ ऑगस्टला उपोषणाचा इशारा

**सांगोला, (कटूसत्य वृत्त):-** सांगोला नगरपालिका हद्दीतील शहरासह वाड्यावस्त्यांवरील ग्रीन झोनमध्ये २ गुंठे क्षेत्र असलेल्या पंतप्रधान आवास योजनेच्या लाभार्थ्यांना बांधकाम व वापर परवाना देण्यात यावा, अन्यथा १५ ऑगस्ट २०२६ रोजी सांगोला तहसील कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्यात येईल, असा इशारा माजी बांधकाम समिती सभापती सतीश सावंत यांनी निवेदनाद्वारे दिला आहे. निवेदनात म्हटले आहे की, केंद्र शासनाच्या पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल व घरविहीन नागरिकांना घरकुलाचा लाभ दिला जात आहे. सांगोला शहर व परिसरातील अनेक लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतला असला, तरी ग्रीन झोनमधील बांधकाम परवानग्या अचानक बंद करण्यात आल्याने अनेकांची घरकुलाची स्वप्ने अपूर्ण राहिली आहेत. सांगोला नगरपालिका हद्दीतील अनेक वाड्यावस्त्यांमध्ये नागरिकांकडे केवळ २ ते ३ गुंठे जागा आहे. मात्र, ग्रीन झोनमध्ये बांधकाम परवान्यासाठी १ एकर (४० आर) क्षेत्राची अट घालण्यात आल्याने प्रत्यक्षात गरीब लार्भाथी योजनेपासून वंचित राहत आहेत. आर्थिकदृष्ट्या सक्षम नागरिकांना या योजनेची गरज नसून, अल्पभूधारक आणि गरीब कुटुंबांनाच या योजनेचा लाभ आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. यापूर्वी ग्रीन झोनमध्ये घरकुलांसाठी बांधकाम व वापर परवाने देण्यात येत होते. त्यामुळे अनेकांनी घरे उभारली होती. मात्र, प्रशासनाने



ही प्रक्रिया थांबवल्यानंतर नागरिकांना परवान्यासाठी वारंवार नगरपालिका कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागत असूनही त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. ग्रीन झोनमध्ये २ गुंठे किंवा त्यापेक्षा अधिक क्षेत्र असलेल्या लाभार्थ्यांना बांधकाम व वापर परवाना दिल्यास पंतप्रधान आवास योजना वाड्यावस्त्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचेल. तसेच नगरपालिकेच्या कर व पाणीपट्टीच्या उत्पन्नातही वाढ होईल, असा दावा सावंत यांनी केला आहे. दरम्यान, ही मागणी मान्य न झाल्यास १५ ऑगस्ट २०२६ रोजी सांगोला तहसील कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्यात येणार असल्याचे त्यांनी निवेदनात स्पष्ट केले आहे.

# जन्म-मृत्यू नोंदणी कायद्यात वंचितांचा हक्क अबाधित राहिलाच पाहिजे - खा. डॉ. ज्योतीताई वाघमारे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जन्म आणि मृत्यू (सुधारणा) अधिनियमाला पूर्ण पाठिंबा देत असतानाच, डिजिटल व्यवस्थेच्या अंमलबजावणीत अनुसूचित जाती-जमाती, वंचित, आदिवासी आणि अशिक्षित नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण होणे अत्यावश्यक असल्याची ठाम भूमिका राज्यसभेतील शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाच्या खासदार प्रा. डॉ. ज्योतीताई वाघमारे यांनी मांडली. तंत्रज्ञानामुळे प्रशासनात पारदर्शकता वाढेल, भ्रष्टाचार आणि दलालशाहीला आळा बसेल; मात्र कायद्याच्या गुंतागुंतीमुळे एकाही गरीब नागरिकाला त्याच्या मूलभूत अधिकारांपासून वंचित राहावे लागू नये, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला. संसदेत बोलताना त्यांनी सांगितले की, सुशासन म्हणजे केवळ डिजिटल व्यवस्था नव्हे, तर समाजातील



शेवटच्या घटकापर्यंत न्याय पोहोचविणारी संवेदनशील यंत्रणा होय डिजिटल क्रांतीचा लाभ प्रत्येक नागरिकाला समानपणे मिळाला पाहिजे. सर्वांना समान हक्क, कोणालाही विशेष सवलत नाही, या तत्त्वावर शासनाने पुढे वाटचाल करावी, असे त्यांनी ठामपणे नमूद केले. यावेळी त्यांनी केंद्र सरकारसमोर तीन महत्त्वपूर्ण सूचना मांडल्या. ग्रामीण व आदिवासी भागात विशेष जन्म-मृत्यू नोंदणी शिबिरे आयोजित करावीत, वंचित नागरिकांसाठी विलंबित नोंदणीवर कोणताही दंड आकारू नये आणि पंचायत स्तरावर अशिक्षित व गरजू नागरिकांना मदत करण्यासाठी 'डिजिटल सहाय्यक' नियुक्त करावेत, अशी मागणी त्यांनी केली. डिजिटल भारताची संकल्पना यशस्वी होण्यासाठी तंत्रज्ञानासोबत सामाजिक न्याय आणि संवेदनशीलतेचाही समतोल राखणे गरजेचे असल्याचे सांगत, गरीब आणि वंचितांच्या हक्कांसाठी संसदेत प्रा. डॉ. ज्योतीताई वाघमारे यांनी पुन्हा एकदा प्रभावीपणे आवाज बुलंद केला.

# जयकुमार गोरे यांच्यावरील आक्षेपार्ह वक्तव्याचा करमाळ्यात तीव्र निषेध

**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकास व पंचायत राजमंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याविषयी करण्यात आलेल्या वक्तव्याच्या निषेधार्थ आज करमाळा येथे भारतीय जनता पार्टीच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात आले. यावेळी कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत निषेध व्यक्त केला. आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांनी खासदार संजय राऊत यांच्या वक्तव्याचा निषेध नोंदवत त्यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याला जोडे मारून संताप व्यक्त केला.



यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष गणेश चिवटे म्हणाले की, लोकशाहीमध्ये मतभेद असणे स्वाभाविक असले तरी टीका करताना सभ्यता, संस्कार आणि राजकीय मर्यादांचे भान राखणे आवश्यक आहे. वैयक्तिक पातळीवर जाऊन अवमानकारक भाषा वापरणे ही महाराष्ट्राच्या सुसंस्कृत राजकीय परंपरेला न शोभणारी बाब आहे,

पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी ग्रामीण विकास, जनकल्याण आणि सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी सातत्याने उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यामुळे अशा विकासाभिमुख नेतृत्वावर खालच्या पातळीवर जाऊन करण्यात येणारी टीका भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते कदापि सहन करणार नाहीत.

भविष्यातही अशा प्रकारची बेजबाबदार वक्तव्ये केल्यास त्याला लोकशाही मार्गाने तीव्र उत्तर दिले जाईल, असा इशाराही गणेश चिवटे यांनी दिला.

यावेळी भाजपा करमाळा शहर मंडल अध्यक्ष काकासाहेब सरडे, नगरसेवक रामभाऊ ढाणे, विजय घोलप, शहराध्यक्ष जगदीश अग्रवाल, ज्येष्ठ नेते भगवानगिरी गोसावी, तालुका उपाध्यक्ष दादासाहेब देवकर, बंडू शिंदे, सोमनाथ घाडगे, हर्षद गाडे, नवनाथ नाळे, नानासाहेब अनारसे, समाधान कांबळे, संजय ढेरे, जयंत काळे पाटील, गणेश महाडिक, रणजीत पवार, राजेश पाटील, गोकुळ मुरुमकर, हनुमंत रणदिवे, दिपक गायकवाड, सागर सरडे, विश्वनाथ ढेरे, अशोक मोरे, संजय दुगुळे, संजय किरवे, तात्यासाहेब शिंदे तसेच भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.